# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com
फोन क्रमांक – 07172-250659

क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 740

दिनांक :- 24 जुलै, 2020

संदर्भ :- 1.या कार्यालयाचे टाळेबंदी आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/645 दि.30.06.2020.
2. या कार्यालयाचे टाळेबंदी आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/697 दि.15.07.2020.

## -: आदेश :-

चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणुचे प्रादुर्भावात वाढ झाल्याने व कोरोना विषाणु बाधित रुग्ण झपाटयाने आढळुन येत असल्याने सदर विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता नागरीकांच्या दैनंदिन व्यवहारात कडक निर्बंध लावणे याबाबतच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणुन या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 02 वरील आदेशान्वये, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व तालुक्यातील ऊर्जानगर आणि दुर्गापुर ग्राम पंचायत क्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये दिनाक 17.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीकरीता मनाई आदेश लागु करण्यात आलेले आहे.

उपरोक्त संदर्भिय क्रं. 02 वरील आदेशान्वये घोषीत करण्यात आलेल्या कालावधीतील लॉकडाऊनमुळे उपरोक्त क्षेत्रात सकारात्मक परिणाम दिसुन आल्याने व कोरोना विषाणुचा प्रादुर्भावाबाबतची परिस्थीती सद्यस्थितीत नियंत्रणात असल्याचे निदर्शनास येत असल्याचे निष्कर्षाप्रत आलेलो असल्याने **मी. डॉ. कुणाल खेमनार, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर पुढील प्रमाणे आदेशीत करीत आहे :-**

**" चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व तालुक्यातील ऊर्जानगर आणि दुर्गापुर ग्राम पंचायत क्षेत्रात दिनाक 17.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये लागु करण्यात आलेले निर्बंध याव्दारे उठविण्यात येत आहेत.**

**परंतु या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 01 वरील आदेशान्वये, चंद्रपूर जिल्हयात दिनाक 01.07.2020 ते दिनांक 31.07.2020 या कालावधीकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये लागु करण्यात आलेले निर्बंध/तरतुदी चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व तालुक्यातील ऊर्जानगर आणि दुर्गापुर ग्राम पंचायत क्षेत्रात यथास्थिती लागु राहतील परंतु त्यामध्ये जिवनावश्यक व जिवनावश्यक व्यतिरिक्त वस्तु, विक्री व वितरण इ. सर्व प्रकारची दुकाने/आस्थापना सोमवार ते रविवार सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंतच राहील "**

सदरचा आदेश माझे सही व शिक्यानिशी दिनांक 24.07.2020 रोजी निर्गमीत करीत असुन सदरचा आदेश दि. 24.07.2020 ते दि. 31.07.2020 पावेतो लागु राहील.

स्वा/-

**(डॉ. कुणाल खेमनार)**
**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**

प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

1. मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
4. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
5. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
6. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
7. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
8. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
9. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय
चंद्रपूर